● मंगळवार, दि २४ सप्टेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ६३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## न भूतो न भविष्यती...




युवा आदर्श

### जीभ ...

जीभ अन् तोंड हे
शरीराचे प्रवेश द्वार
अन्न पदार्थ करतात
ट्रॅफिक जॅम वारंवार
दृश्य अदृश्य किटाणूं
जिव्हेवर होती स्वार
न कळत घरोबा करे
चित्र विचीत्र आजार
दुर्लक्षित करी सहज
का महत्वाचे औजार
काळजी नाही घेणार
कारणे शोधतो हजार
सुंदर दिसावा चेहरा
अट्टाहास करे अपार
जिभेची कसली निगा
विसरूनि जातो पार
चरक संहिता जाणावी
पहा शास्त्रोक्त आधार
रे चुरुचुरु बोलणा-या
का जिव्हेची बोथटधार
जपा जीभेची संवेदना
सारे सोपे सोपस्कार
आरोग्य जागृती व्हावी
चरक पध्दत पुरस्कार

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

व्यापाऱ्यांच्या दुकानांवर झालेल्या भ्याड हल्ल्याचा निषेधार्थ सकल हिंदू समाजाचा विराट मूक मोर्चा; कडकडीत बंद

# हिंदुच्या एकजुटतेचे विराट दर्शन...

जालना । प्रतिनिधी - जालना शहरात सकल हिंदू समाजच्यावतीने पुकारलेल्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून शहरातील व्यापाऱ्यांनी कडकडीत बंद पाळला. मागील आठवड्यात झालेल्या ईद-ए-मिलाद निमित्ताने काढण्यात आलेल्या रॅलीत हिंदू समाजाच्या दुकानांवर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ मूक मोर्चा काढत बंद पुकारण्यात आला होता. या मोर्चास अभूतपुर्व प्रतिसाद मिळाला असून हिंदूच्या एकतेचे विराट दर्शन जालनेकरांना अनुभवयास मिळाले आहे. व्यापाऱ्यांनीही कडकडीत बंद पाळत प्रतिसाद दिला.

गेल्या १९ सप्टेंबर रोजी मुस्लिम सम ाजाच्या वतीने ईद मिलादुन्नबी निमित्त काढलेल्या मिरवणुकीत हिंदू समाजातील दोन दुकानांची तोडफोड करण्यात आली होती. या घटनेच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाच्यावतीने सोमवार (दि २३) रोजी मूक मोर्चा काढत बंदही पुकारला होता. डॉ. राजेंद्र प्रसाद रोडवरील श्रीराम मंदिर येथे महाआरती करून या मोर्चास सुरुवात करण्यात आली. लाखोंच्या संख्येने सहभागी झालेल्या हिंदु समाज बांधवानी शांततेचे व एकजुटतेचे विराट रुप दिसून आले. या रॅलीचा जुना जालन्यातील गांधीचमन येथे हनुमान चालीसा पठणाने समारोप करण्यात आला.

दरम्यान तहसीलदार श्रीमती छाया पवार यांनी हिंदू समाजाच्यावतीने देण्यात आलेले निवेदन स्विकारले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांची उपस्थिती होती. पोलीसांनी तगडा बंदोबस्त ठेवला होता. ईद निमित्ताने काढण्यात आलेल्या मिरवणुकीत प्रभू श्रीराम ाबद्दल अश्लिल आणि अवमानजनक गाणे वाजविणाऱ्यांविरोधात कारवाई करण्यासह हिंदु महिलांची छेड काढणे, मनाला लज्जा वाटेल असे द्विअर्थी शब्द प्रयोग करुन बोलणे यासंदर्भातील व्हिडीओ क्लिप पोलीसांना देऊनही कारवाई होत नसल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. याच बरोबरच भारतात राहून इतर देशांचे झेंडे फडकवणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा या म ागणीसह इतर मागण्यांचा समावेश आहे.





**कडकडीत बंद...**

सकल हिंदू समाजच्या वतीने आयोजित भव्य विराट मूक मोर्चा मध्ये लाखोंच्या संख्येने हिंदू बांधव उपस्थित होते. पुकारण्यात आलेल्या बंदला शहरातील व्यापाऱ्यांनी भरभरुन प्रतिसाद दिला असुन स्वयंस्फुतीने आपली दुकाने बंद ठेवत कडकडीत बंद पाळण्यात आला. (छायाचित्र किरण खानापुरे)

# संपादकीय

## भारतानेही सतर्क राहावे

इस्राईल आणि हमास यांच्या युद्धातील नवा अंक आता सुरू झाला आहे. दोन दिवसांपूर्वी या युद्धात नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आणि संपूर्ण जगात तंत्रज्ञानाचा उपयोग आणि दुरुपयोग यावर पुन्हा चर्चा होऊ लागली. दोन दिवसांपूर्वी लेबनॉन मध्ये एकाच वेळी हजारो पेजरचा स्फोट झाला. हा स्फोट ताजा असतानाच त्याच्या दुसऱ्या दिवशी लेबनॉनमध्येच हजारो वकिटॉकीचा स्फोट झाला. या स्फोटात हजारो हिजबुल्ला जखमी झाले तर काहींना जीव गमवावा लागला. जगभर या स्फोटाची चर्चा सुरू झाली. हा स्फोट इस्राईलची गुप्तचर संघटना मोसादने घडवून आणला असा आरोप लेबनॉनने केला असून या स्फोटाला लवकरच जशास तसे उत्तर देण्यात येईल अशी घोषणा केली. या स्फोटा नंतर संपूर्ण जगात खळबळ माजली. पेजर सारख्या छोट्या उपकरणाचा संहारक शस्त्र म्हणून वापर करता येऊ शकतो असा विचारच कोणी केला नाही. वास्तविक पेजर हे सध्या कालबाह्य झालेले उपकरण आहे. १९९० साली आलेले हे उपकरण एकमेकांशी संपर्क करण्यासाठी वापरले जात असे. अर्थात यात फोन प्रमाणे बोलता येत नाही तर या उपकरणाद्वारे फक्त एकमेकांना छोटे टेक्स्ट मेसेज पाठवता येतात. भारतात हे उपकरण १९९५ साली आले मात्र म्हणावे तसे हे उपकरण यशस्वी ठरले नाही. मोबाईल आल्यानंतर तर त्याचा वापरच संपला असे असतानाही कालबाह्य झालेले हे उपकरण हिजबुल्ला का वापरत होते असा प्रश्न पडला असे ल तर त्याचे उत्तर असे आहे की पेजर वापरकर्त्याचे लोकेशन ट्रेस करता येत नाही. केवळ मेसेज पाठवला जात असल्याने मेसेज दोघांशिवाय तीसऱ्याला दिसत नाही म्हणूनच हीजबुल्ला चे कमांडर हे उपकरण वापरत होते. हे उपरकरण सुरक्षित आहे असा त्यांचा समज होता मात्र हा समज तेंव्हा खोटा ठरला जेंव्हा लेबनॉन मध्ये एका पाठोपाठ एक स्फोट झाले. लेबनॉन मध्ये ज्या पेजरचा स्फोट झाला त्या पेजरमध्ये अल्पप्रमाणात पेइटीएन स्फोटकांचा वापर करण्यात आला होता. या पेजरमध्ये ज्या बॅटरया वापरण्यात आल्या होत्या त्या आयात करण्यात आल्या होत्या. याच बॅटर्यांमध्ये हे स्फोटके लपवले होते असे म्हंटले जाते. या स्फोटानंतर जगभर इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे. भारततही आता तसाच प्रश्न विचारला जात आहे कारण भविष्यातील युद्ध हे अशाच तंत्रज्ञानाचा वापर करून लढले जाणार आहे. आज जे तंत्रज्ञान वापरून इस्राईलने हा हल्ला केला तेच तंत्रज्ञान जर अतिरेक्यांच्या हातात लागले तर जगभर हाहाकार उडेल. भारतात तर अब्जावधी लोक मोबाईल वापरतात. जगात सर्वात जास्त मोबाईल भारतीय नागरिक वपरतात. आज जर पेजर, वॉकीटॉकीचा वापर बॉम्ब म्हणून केला जातो तर भविष्यात मोबाईलही बॉम्ब होऊ शकतो. भारतात जे मोबाईल वापरण्यात येतात त्याची बॅटरी ही परदेशातून आयात केलेली असते. भारतात वापरण्यात येत असलेल्या ९० टक्के मोबाईलच्या बॅटरया या चीन, तैवान आणि हॉंगकॉंग येथून आपण आयात करतो केवळ मोबाईल किंवा मोबाईलची बॅटरीच नाही तर दररोज पाच लक्ष इलेक्ट्रॉनिक वस्तू आपण परदेशातून आयात करतो. भारतातील संबंधित अथॉरिटी देखील मान्य करेल की देशात आयात होणाऱ्या ९० टक्के उपकरणांची कोणतीही तपासणी होत नाही. यावरून लक्षात येईल की आपल्या देशात किती धोकेदायक परिस्थिती आहे. देशातील प्रत्येक नागरिक आपल्या खिशात एक बॉम्ब घेऊन फिरतोय असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मागील काही दिवसात जम्मू काश्मीरमध्ये अतिरेकी पुन्हा सक्रिय झाले आहेत. काश्मीरमध्ये घुसखोरी वाढली आहे. सीमेवर दहशतवादी कारवाया वाढल्या आहेत. गुप्तचर संस्थांच्या चौकशीतून हे निष्पन्न झाले आहे की अतिरेकी घुसखोरी करताना मोठ्या प्रमाणात मोबाईल पचा वापर करत आहेत. या प चा वापर गिर्यारोहक पर्वतावर, डोंगरावर चडण्यासाठी करतात आता याच पचा वापर करत अतिरेकी घुसखोरी करत आहेत. चीन तर आपला १ नंबर चा शत्रू आहे. तंत्रज्ञानाचा दुरुपयोग करण्यात चीनचा हातखंडा आहे. उद्या लेबनॉन स्फोटात वापरण्यात आलेले तंत्रज्ञान अतिरेक्यांच्या हाताला लागले किंवा चीन सारखा देश त्याचा वापर शस्त्र म्हणून करू लागला तर तर काय होईल याचा विचारही करवत नाही म्हणूनच भारताने याबाबत दक्ष राहायला हवे. भारतात विदेशातून येणाऱ्या सर्व इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तसेच वस्तूंची १०० टक्के तपासणी व्हायला हवी. मोबाईल, टॅब्लेट, ~~लॅपटॉप, स्मार्ट वॉच यासारख्या गॅझेट वापरा संदर्भात सरकारने~~ गाईड लाईन निश्चित करण्यात करावी. प्रत्येक नागरिकांना या बाबत प्रशिक्षण द्यावे. लेबनॉन मध्ये जे झाले ते भारतात होऊ नये यासाठी सरकारने आतापासूनच दक्ष राहून योग्य ती खबरदारी घ्यावी कारण युद्धाच्या या नव्या प्रकाराचा धोका भारताला अधिक आहे. भारताने लेबनॉन पासून धडा घ्यायला हवा. **श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेचा तिसरा हप्ता २९ सप्टेंबरपासून मिळणार

**मुंबई । प्रतिनिधी -** महिलांना आर्थिक सक्षम बनवणारी मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेच्या तिसऱ्या हप्त्याचे पैसे लाभार्थ्यांना दि. २९ सप्टेंबर पासून डीबीटी द्वारे हस्तांतरित करण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. आज मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेची आढावा बैठक आज मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती.

दि.२९ सप्टेंबर २०२४ रोजी रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात मुख्यमंत्री - माझी लाडकी बहिण योजनेचा राज्यस्तरीय कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या नियोजन संदर्भात आढावा घेण्यात आला. व्यासपीठाचे व्यवस्थापन, कायदा व सुरक्षा, सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यक्रमस्थळी पार्किंगची व्यवस्था, पिण्याचे पाणी, लाभार्थ्यांची यशोगाथा याबाबतच्या महत्वाच्या सूचना मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्या.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पूर्वतयारीकरीता प्रशिक्षण संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ प्रक्रियेच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उप जिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात अधिकारी यांच्या सार्वत्रिक निवडणूक पूर्वतयारी प्रशिक्षणाचे आयोजन केले होते.

विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने यावेळी प्रशिक्षणात पात्रता-अपात्रता, नामाकंन, गुन्हेगारी पूर्ववृत्तांबद्दल सूचना, नामांकन सुरक्षा, मतदान केंद्र तपासणी, अतीसंवेदनसिल मतदान केंद्र निश्चित करणे, मतदान केंद्र आणि मतम ोजणी केंद्राचे नियोजन, एम सीएमसी, पेड न्यूज, आदर्श आचारसंहितेचा भंग, स्वीप, ईव्हीएम-व्हीव्हीपॅट, पोस्टल मतदान, सी-व्हीजील प्रणाली आदी विषयावर सविस्तर माहिती देण्यात आली.

प्रारंभी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले की, विधानसभा निवडणूकीसाठी खुप कमी कालावधी राहिला आहे. याकरीता निवडणूक प्रक्रियेतील सर्व यंत्रणांनी निवडणुकीच्या कामाचे सुक्ष्म नियोजन करुन जबाबदारीने कामे पार पाडावीत. तसेच सोपविण्यात आलेल्या जबाबदारीची पूर्वतयारी करावी.



यावेळी अप्पर जिल्हाधिकारी रिता म ेत्रेवार,जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा सूचना अधिकारी आर. पी. पडळकर,उपविभागीय अधिकारी श्रीमंत हारकर, उपविभागीय अधिकारी दिपक पाटील, डॉ. दयानंद जगताप, पद्माकर गायकवाड यांनी निवडणूकीच्या अनुषंगाने विविध विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी प्रशिक्षणास सर्व तहसिलदार, नायब तहसिलदार यांच्यासह विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# लोकशाहीचे बळकटीकरण करणे ही न्यायालयाची भूमिका - मुख्यमंत्री शिंदे

## मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रस्तावित नवीन संकुलाचा भूमिपूजन समारंभ

**मुंबई । प्रतिनिधी -** भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ. धनंजय वाय चंद्रचूड यांनी आज वांद्रे पूर्व, मुंबई येथे प्रस्तावित नवीन जागेचे भूमिपूजन केले. त्यानंतर वांद्रे पश्चिम येथे झालेल्या मुख्य समारंभात बोलताना, मुंबई उच्च न्यायालयासाठी नवीन हायकोर्ट संकुल हे या प्रवासातील पहिले पाऊल असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

या भूमिपूजन कार्यक्रम प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी.आर.गवई, न्यायमूर्ती ए.एस.ओक, न्यायम ूर्ती दीपंकर दत्ता, न्यायमूर्ती उज्वल भुयान आणि न्यायमूर्ती प्रसन्न बी. वराळे व मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुम ार उपाध्याय, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सॉलिसिटर जनरल श्री.व्यास, श्री. सराफ, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, तसेच न्यायालयीन कामकाजाशी संबधित बार कौन्सिल अध्यक्ष वकील, अभिवक्ता यावेळी उपस्थित होते.

सरन्यायाधीश म्हणाले की, नवीन उच्च न्यायालय संकुलाचे काम सुरू करण्यासाठी २३ सप्टेंबर २०२४ ही तारीख ऐतिहासिक ठरेल. मुंबई उच्च न्यायालयाने अनेक राष्ट्रीय व्यक्तीम त्व दिले असून त्याचा वारसा हा सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय क्षेत्रात पसरलेला आहे. त्यामुळे उच्च न्यायालयाचे हे नवीन संकुल सर्वांसाठी प्रवेशयोग्य असेल, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, महाराष्ट्र राज्य आणि मुंबईच्या दृष्टीने आजचा दिवस म हत्त्वाचा आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन झाले, ही नव्या युगाची सुरूवात आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीचे स्वप्न आता प्रत्यक्षात साकार होत असून या भूमिपूजन समारंभाच्या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होता आले, ही माझ्यासाठी गौरवाची आणि आनंदाची बाब आहे.

लोकशाहीचे बळकटीकरण करणे ही न्यायालयांची भूमिका असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, स्वातंत्र्य, समता, बंधुता हे केवळ शब्द नसून ती मार्गदर्शक तत्वे आहेत. या तत्त्वांनीच न्यायप्राक्रियेवरील विश्वास अधिक दृढ केला आहे. या नवीन इमारतीमधून न्याय व्यवस्थेच्या वाढत्या गरजा पूर्ण होतील. मुंबई उच्च न्यायालयाच्या या इमारतीमधून न्यायदानाचे होणारे काम भावी पिढीसाठी प्रेरणा व ऊर्जा देणारे ठरावे, अशी अपेक्षा मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पीडित व्यक्तींना जलद न्याय मिळावा अशी लोकांची धारणा असते. न्याय व्यवस्था अधिक गतिमान असणे आवश्यक असून यासाठी शासनाने अनेक महत्वाचे निर्णय घेऊन न्याय व्यवस्था अधिक मजबूत करण्यास प्राधान्य दिले आहे. राज्यात ३२ न्यायालयांच्या बांधकामाला मान्यता दिली असून आवश्यकतेनुसार न्यायिक अधिकाऱ्यांची पदेही निर्माण केली आहेत. जनतेला जलद न्याय मिळवा यासाठी न्यायालय बरोबरच सरकारचेही प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले न्यायव्यवस्था ही आपल्या राज्यघटनेची , नागरिकांच्या हक्कांची आणि कायद्याच्या राज्याची रक्षक म्हणून उभी आहे. भारतासारख्या लोकशाहीमध्ये स्वतंत्र, कार्यक्षम आणि सुलभ न्यायव्यवस्थेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. नुसता न्याय केला जात नाही, तर अविलंब, निष्पक्ष आणि न्याय्यपणे करणं ही आपल्यावर राज्य घटनेने टाकलेली जबाबदारी आहे. त्यासाठी ज्या काही पायाभूत सोयी लागतील त्या उपलब्ध करण्यासाठी शासन कटिबध्द असल्याचे ते म्हणाले.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आजचा दिवस राज्यासाठी अत्यंत आनंदाचा दिवस आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन सर्वोच न्यायालयाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ. धनंजय वाय चंद्रचूड यांच्या हस्ते झाले. आपल्या देशात लोकशाहीच्या ज्या महत्त्वाच्या संस्था आहेत त्यातील न्याय व्यवस्था या संस्थेवर जनतेचा अधिक विश्वास आहे. या संस्थेला जनतेच्या म नात सर्वोच्च स्थान आहे.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, उच्च न्यायालयाची सध्याची इमारत ऐतिहासिक इमारत आहे. या न्यायालयात लोकमान्य टिळकांचा चाललेला खटला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी येथे केलेले वकिलीचे काम असा या इमारतीला मोठा इतिहास आहे. आताची इमारत ऐतिहासिक इमारत असून ती स्थापत्य कलेचा समृद्ध वारसा आहे. या इमारतीमधून अनेक महत्त्वाचे निर्णय दिले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लोकांचे जीवन बदलले आहे. उच्च न्यायालयाच्या नवीन इमारतीमधूनही न्यायदानाचे काम तितक्याच वेगाने होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी सर्व महाराष्ट्रात ३८३ ई सेवा केंद्राच्या शुभारंभ करण्यात आला. तसेच बॉम्बे डिजिटल लॉ रिपोर्ट या कृत्रिम बुद्धिमत्ता यावर आधारित शोध इंजिनचा शुभारंभ करण्यात आला. या इंजिन मुळे न्यायालयीन निकाल कोणत्याही भाषेत पाहणे सहज शक्य होणार आहे.

# बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेवर पोलीसांचा प्रत्युत्तरादाखल गोळीबार

**बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेवर पोलीसांचा प्रत्युत्तरादाखल गोळीबार**

**बदलापूर । प्रतिनिधी -** बदलापूर शाळा लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेने पोलिसांवर गोळीबार केला केला आहे. ठाणे क्राइम ब्रॅचच्या टीमकडून त्याला चौकशीसाठी घेऊन जात असताना ही घटना घडली. यावेळी अक्षयने पोलीसांजवळील बंदूक हिसकावरून त्यांच्या दिशेने गोळीबार केला. यावेळी प्रत्युत्तरादाखल पोलिसांनीही गोळीबार केला. या गोळीबारात या आरोपी अक्षय शिंदे ठार झाल्याची माहिती आहे. तसेच सहायक पोलिस निरीक्षक निलेश मोरे जखमी झाले आहेत.

ठाणे क्राइम ब्रॅचच्या टीमने आज अक्षयला तळोजा जेलमधून ताब्यात घेतले होते. तसेच त्याला दुपारच्या सुमारास घटनास्थळाची पाहणी करण्याकरीता घेऊन असताना मुंब्रा बाह्यवळण मार्ग येथे पोहोचताच अक्षयने पोलिसांजवळील बंदूक हिसकली आणि पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनीही त्याच्या दिशेने गोळीबार केला. पोलिसांच्या गोळीबारात अक्षय जखमी झाला. त्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्याला मृत घोषीत केले. हा संपूर्ण प्रकार पोलिसांच्या वाहनातच घडला.

काही दिवसांपूर्वीच बदलापूर येथील एका शाळेत दोन चिमुकल्या विद्यार्थिनीवर अत्याचार झाल्याचे प्रकरण समोर आले होते. या घटनेनंतर बदलापूरमध्ये नागरिकांनी रेल्वे रुळावर उतरून आंदोलन केले होते. या आंदोलनामुळे तणावाचे वातावरण होते. त्यानंतर अक्षय शिंदे याला अटकही करण्यात आली होती. या आंदोलनाची दखल घेत राज्य शासनाने या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी नेमली होती. या एसआयटीच्या टीमने या प्रकरणाचा तपास करून कल्याण न्यायालयात आरोपपत्र दाखल केले होते. असे असतानाच अक्षय शिंदे याच्या दुसऱ्या पत्नीने दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी त्याच्या विरोधात अनैसर्गिक लैंगिक संबंध प्रस्थापित केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता.

या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी ठाणे पोलिसांची क्राईम ब्राँच टीमने त्याला ताब्यात घेतले होते. सोमवारी सायंकाळी पोलीस त्याला तळोजा कारागृहातून बाहेर घेऊन जात असताना त्याने पोलीस अधिकाऱ्याची बंदूक हिसकावून पोलिसांवर गोळ्या झाडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसांनी स्वसंरक्षणार्थ अक्षयवर गोळीबार केला यात तो ठार झाला.

दरम्यान, या घटनेनंतर आरोपी अक्षय शिंदेच्या आईने टीव्ही ९ वृत्तवाहिनीला प्रतिक्रिया दिली. माझा पोरगा असं काही करणार नाही ( बदलापूरच्या घटनेबाबत ) माझा पोरगा एकदम गरीब होता, अशी घाण सवय त्याला लावलेली नाही, माझा पोरगा फटाकाही वाजवत नाही, तो गाड्यांना घाबरायचा, असे त्या म्हणाल्या.

**पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न...**

अक्षय शिंदे पोलीस चकमकीत ठार झाल्यानंतर विरोधी पक्षांच्या नेत्यांनी राज्य सरकार व पोलिसांच्या कारभावार प्रश्न उपस्थित केले आहेत. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणावरून एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. या पोस्टद्वारे त्यांनी या पोलीस चकमक प्रकरणाची न्यायिक चौकशी करण्याची मागणी केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले, याची न्यायिक चौकशी झालीच पाहिजे! अक्षय शिंदे याने गोळी झाडून घेणे म्हणजे पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न आहे का? अक्षय शिंदे याने गोळी नेमकी कशी झाडली? आरोपी अक्षय शिंदे पोलिसांच्या ताब्यात असताना त्याचे हात बांधले नव्हते का? त्याला बंदूक कशी काय मिळाली? पोलीस इतके बेसावध कसे असू शकतात?

विजय वडेट्टीवार म्हणाले, बदलापूर प्रकरणात एकीकडे संस्थाचालक भाजपाशी सबंधित असताना संस्थाचालकांवर कारवाई होत नाही, दुसरीकडे आज आरोपी अक्षय शिंदे स्वतःवर गोळी झाडून घेतो हे अतिशय धक्कादायक आणि संशयास्पद आहे. बदलापूर प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेवर आमचा पहिल्यापासून विश्वास नाही. आमची मागणी आहे की आता या प्रकरणाची न्यायिक चौकशी झालीच पाहिजे!

**भाजपा पदाधिकाऱ्याला वाचवण्यासाठी फेक एन्काउंटर?**

पाठोपाठ राज्याचे माजी गृहमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे आमदार अनिल देशमुख यांनी देखील या प्रकरणावर भाष्य करणारी एक पोस्ट एक्सवर केली आहे. देशमुख म्हणाले, बदलापूर घटनेतील आरोपी अक्षय शिंदेचा एन्काऊंटर झाल्याचे वृत्त समजले. स्वसंरक्षणाचा हा बनाव विश्वास ठेवण्यासारखा नाही. दोन्ही हातात बेड्या असलेला माणूस पोलिसांचेही पिस्तूल कसे हिसकाऊ शकतो. सदर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे जेवढा दोषी होता तितकेच दोषी शाळाचालक भाजपा पदाधिकारी देखील आहेत. आपल्या पक्षातील पदाधिकाऱ्याला वाचवण्यासाठी आणि प्रकरण दडपण्यासाठी हे एन्काऊंटरचे फेक नटिव्ह सेट केले जात आहे.

**माझा मुलगा असं करुच शकत नाही**

बदलापूर अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषणातील आरोपी अक्षय शिंदेंने पोलिसांकडून पिस्तुल हिसकावून गोळीबार केला याबाबत विचारलं असता अक्षय शिंदेची आई म्हणाली, माझा मुलगा असं करुच शकत नाही. माझ्या मुलाबद्दल काहीही बोलतील, तो असं करुच शकत नाही. कामावर गेले तर रस्ता क्रॉस करतानाही मी त्याचा हात धरत असे. अक्षय शिंदे रस्ता क्रॉस करताना गाड्या येतात त्यांनाही घाबरत होता. तो कसा काय गोळीबार करेल? असा प्रश्न अक्षय शिंदेच्या आईने विचारला आहे. टीव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीला अक्षय शिंदेच्या आईने फोनवरुन प्रतिक्रिया दिली.

बदलापूर लैंगिक शोषण प्रकरणात अक्षय शिंदे हा आरोपी होता. त्याने दोन चिमुरड्या मुलींचं लैंगिक शोषण केलं. १२ आणि १३ ऑगस्टला ही घटना घडली. त्यानंतर २० ऑगस्टला या प्रकरणाच्या विरोधात बदलापूरम ध्ये मोठा बंद पाहण्यास मिळाला. बदलापूर बंदमध्ये शेकडो लोक सहभागी झाले होते. बदलापूरकरांनी ९ तास रेल्वे रोकोही केला होता. या घटनेनंतर अक्षय शिंदेला फाशी द्या ही मागणीही जोर धरु लागली होती. आता अक्षय शिंदेचा पोलीस गोळीबारात मृत्यू झाला आहे.

**विरोधीपक्षांनी आरोपीची बाजू घेणं चुकीचं -देवेंद्र फडणवीस**

या प्रकरणातील आरोपीच्या पूर्व पत्नीने लैंगिक अत्याचाराची तक्रार केली होती. यासंदर्भात चौकशी करण्याकरिता त्याला नेण्यात येत होतं. त्यावेळी त्याने पोलिसांजवळील बंदूक हिसकावून पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. त्यामुळे पोलिसांनीही स्वरक्षणार्थ त्याच्या दिशेने गोळीबार केला. त्यानंतर त्याला रुग्णालयात नेण्यात आलं. त्याच्या मृत्यूबाबत डॉक्टरांनी अधिकृत घोषणा केलेली नाही. मात्र, मला जी माहिती मि ळाली आहे, त्यानुसार त्याचा मृत्यू झाला आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

दरम्यान, या घटनेनंतर आता विरोधकांकडून या चकमकीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. यासंदर्भात विचारलं असता, विरोधकांकडून प्रत्येक गोष्टीचं राजकारण केलं जातं. हा तोच विरोधीपक्ष आहे, जो आरोपीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी करत होता. मात्र, आता आरोपीने पोलिसांवर गोळाबार केला, तेव्हा विरोधीपक्षाकडून आरोपीची बाजू घेतली जात आहे. हे चुकीचं आहे, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

तळोजा तुरुंगातून अक्षय शिंदेला आणलं जात होतं. तेव्हा एपीआय मोरे यांची बंदुक अक्षय शिंदेने खेचली आणि गोळीबार केला आणि पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्याच्या हातात लोडेड बंदुक होती त्यानंतर पोलिसांनी स्वरक्षणार्थ त्याच्यावर गोळीबार केला. त्यावेळी अक्षय शिंदेला गोळ्या लागल्या. अक्षय शिंदे ला आणि जखमी पोलिसांना रुग्णालयात आणण्यात आलं. मात्र तोपर्यंत अक्षय शिंदेचा मृत्यू झाला. ही माहिती आता समोर आली आहे. पीटीआयने या बाबतचं वृत्त दिलं आहे.

## महिलांकडून पेढे वाटप, फटाकेही फोडले

अक्षय शिंदे याच्या मृत्यूनंतर बदलापुरातील आंदोलन महिलांनी एकमेकांना पेढे भरून आनंद व्यक्त केला. मनसेच्या संगीता चेंदवणकर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रियंका दामले यांच्यासह या आंदोलनात पुढाकार घेतलेल्या आंदोलक महिलांनी एकमेकांना पेढे भरून आनंद व्यक्त केला. आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व पालक, महिला आणि आंदोलकांचे त्यांनी यावेळी आभार मानले.

# भोकरदन शहर दिवसभर बंद कडकडीत बंद; मराठा समाज कडून प्रशासनाला निवेदन

**भोकरदन । प्रतिनिधी -** भोकरदन शहर सकल मराठा समाजाच्या वतीने बंद पुकारण्यात आला होता. त्याला शहरातील सर्व समाज बांधवांनी व व्यापाऱ्यांनी प्रतिसाद देत आप आपली दुकाने दिवसभर बंद ठेवली. व सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले.मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे ओ.बी.सी.प्रमाणपत्र द्यावे व हैद्राबाद/ सातारा व बॉम्बे गॅजेट लागू करावे तसेच वर्षभरात मराठा बांधवांवर

दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे मागे घेण्यात यावे या मागण्यांसाठी भोकरदन शहर व्यापाऱ्यांकडून उत्स्फूर्तपणे बंद पाळण्यात आला. यामुळे शहरातील व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार, दुकाने, उद्योग कडकडीत बंद ठेवून बंदमध्ये सहभागी झाल्याने सकल मराठा समाजाने पुकारलेला बंद १०० टक्के यशस्वी झाला असून बंदच्या दरम्यान नेहमीचे वर्दळीचे रस्तेही निर्मनुष्य दिसून आले.मराठा योद्धा जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ पुकारलेल्या बंदच्या हाकेला साथ देत भोकरदन शहर शंभर टक्के कडकडीत बंद करण्यात आले होते.यावेळी सकल मराठा समाज बांधवांनी शहरातील प्रत्येक भागात मिरवणूक काढून व्यापारी बांधवांना शांततेत बंद करण्याचे आवाहन केले व सर्वधर्मीय व्यापाऱ्यांनी या बंदला समर्थन देत आपले दुकाने व प्रतिष्ठाने बंद ठेवली.जर जरांगे पाटील



यांच्या प्रकृतीस काही हानी झाली तर मराठा समाज रस्त्यावर उतरेल असा इशारा सकल मराठा समाज भोकरदनच्या वतीने देण्यात आला. शहरातील सर्वच व्यापाऱ्यांनी आपली दुकाने,उद्योग,छोटेमोठे व्यापार,हातगडीवल्यांनी बंद ठेवून बंदमध्ये सहभागी होत बंद १०० टक्के यशस्वी केला.भोकरदन सकल मराठा समाजाच्या वतीने व्यापारी, उद्योजक, व्यवसायिक, छोटेमोठे उद्योग करणाऱ्यांचे आभार मानण्यात आले.यावेळी मराठा समाज बांधवांसह सर्व समाजातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात पीक कापणी प्रयोगाद्वारे ठरणार नुकसानीची सरासरी - आ लोणीकर

**जालना । प्रतिनिधी -** परतुर विधानसभा मतदारसंघातील मंठा व परतूर तालुक्यासह जालना जिल्ह्यातील जवळपास सर्वच महसूल मंडळात ६५ मिलिमीटर ते २०० मिलिमीटर अतिवृष्टीची नोंद झाली असून अनेक गावातील शेती पिके पुराच्या पाण्याने वाहून गेली आहेत. जालना जिल्ह्यातील हजारो हेक्टर शेतजमिनी पुराच्या पाण्याने खरडून निघाल्या आहेत. सोयाबीन या पिकावर अतिवृष्टीने व्हायरसचा अटॅक आल्याने. सोयाबीनचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घटले असून ७० ते ८० टक्के नुकसान झाले आहे. याबरोबरच शेतात झालेल्या अतिवृष्टीने पाणी साचल्याने तूर कापूस या पिकांचे मुळे कूजली आहेत. यामुळे पातेगळ फुलगळ व पानगळ झाल्याने पिक उबाळून निघाली आहेत. परंतु शेतकरी बांधवांना अर्थसाह्य उपलब्ध होण्याच्या उद्देशाने देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांनी देशभरात पंतप्रधान फसल बीमा योजना आणली असून या माध्यमातून एक रुपयात पिक विमा ही कल्याणकारी योजना महाराष्ट्रात मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे यशस्वीपणे राबवत असून. शेतकऱ्यांना पिक विमा मिळावा याकरिता पीक कापणी प्रयोग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे. त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. पुढे या पत्रकात म्हटले आहे की जालना जिल्ह्यातील सर्वच महसूल मंडळात पीक कापणी प्रयोग राबविण्याकरिता गाव पातळीवर सरपंच तलाठी ग्रामसेवक कृषी सहाय्यक व शेतकरी सल्लागार कृषी शेतकरी मित्र यांची समिती असते. तर तालुका पातळीवर तहसीलदार तालुका कृषी अधिकारी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांच्यासह समिती असते. तर जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्यासह नियोजित समिती असते. या समित्यांना आमदार बबनराव लोणीकर यांनी सूचना देताना म्हटले आहे की नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने आवश्यक ते सर्व ठिकाणी पिक कापणी प्रयोग यशस्वीपणे राबवावा. या पीक कापणी प्रयोगाकडे सरपंच माजी पंचायत समिती सदस्य जिल्हा परिषद सदस्य व भारतीय जनता पक्षाच्या सर्व नेते पदाधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देण्याचे आवाहनही या आमदार लोणीकर यांनी केल आहे.

# शूर वीरांना व स्व. स्वा. सैनिक धाकलेश्वर मक्काजी करनाडे यांना बसपाच्या वतीने अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या शूर वीरांना व जालना शहरातील स्वर्गीय स्वातंत्र्य सैनिक धाकलेश्वर मक्काजी करनाडे यांच्या मस्तगड येथील स्मारकास बहुजन समाज पार्टी जालनाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी जालना विधानसभा अध्यक्ष राहुल सत्यानारायणजी करनाडे यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामच्या शुरविरांच्या माहिती देतांना सांगितले की, मराठवाडा मुक्ती संग्राम हा भारतीय स्वातंत्र्य संग्रामाचा एक महत्वाचा भाग होता. सन १९४७ च्या स्वातंत्र्यानंतर मराठवाडा भारतात सामील झाला, पण त्याला अनेक संघर्षांचा सामना करावा





लागला. या संग्रामात अनेक नायक आणि शूरवीरांचा सहभाग होता. त्यामध्ये जालन्यातील स्व. स्वातंत्र्य सैनिक धाकलेश्वर मक्काजी करनाडे यांचाही सिंहाचा वाटा होता असे त्यांनी शेवटी सांगितले.

यावेळी बहुजन समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष चंद्रमनी गाडेकर, विधानसभा प्रभारी संजय खरात, शेख फेरोज, विधानसभा उपाध्यक्ष कुलदीप चांदोडे, विधानसभा महासचिव रविंद्र गवई, विधासभा सचिव दिपक डोंगरे, विधानसभा कोषाध्यक्ष सैय्यद स्माईल, कैलास परदेशी, राजु जाजुरे, शैलेद्र परदेशी, तलखडे, एस. खैरे, वि. पवार, जे. बोडे, शिसोदे, ठाकुर आदींची उपस्थिती होती. यासर्वांनी मराठवाडा मुक्तीदिनाचे औचित्य साधुन मस्तगड येथील परिसरातील साफसफाई व स्वच्छता ही करण्यात आली.

# मनोज जरांगे यांच्या केसालाही धक्का लागला तर याद राखा, तुमच्या शंभर पिढ्या राजकारणात नसतील - ॲड शंकर चव्हाण

**बीड । प्रतिनिधी -** मनोज जरांगे पाटील यांची तब्येत आता गंभीर स्वरुपात खालावली असल्याचे पाहून सकल मराठा बांधव हे आंतरवाली सराटीकडे



धाव घेतांना दिसत आहेत. आंतरवाली सराटीकडे सकल मराठा बांधव जात असतांना पोलीसांकडून रस्ता रोखला जात आहे. मराठा बांधवांना आंतरवाली सराटीकडे मनोज जारांगे पाटील यांच्या भेटीसाठी जाणीवपूर्वक जाऊ दिले जात नसलेबाबत सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे. त्यातच आंतरवाली सराटीकडे जात असतांना काही मराठा बांधवानां इतर समाजातील लोकांकडून अमानुष मारहाण होत असल्याचेही व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हारल होत आहेत.

आंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा आमरण उपोषण सुरू केलं असून आज उपोषणाचा ६ वा दिवस आहे. एकीकडे मराठा समाज मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ संपूर्ण महाराष्ट्र एकवटला असून अंतरवाली सराटीत देखील समाजाने मोठया प्रमाणात गर्दी केली आहे. सकल मराठा समाजाच्या वतीने महाराष्ट्रातील एकापाठोपाठ एक एक जिल्हा बंदची हाक देत आहेत व त्याचप्रमाणे उपोषणास समर्थन म्हणून कडकडीत जिल्हा बंदही पाळला जात आहेत.

सगे-सोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी करा, हैदराबाद गॅझेट लागू करा, सातारा गॅझेट लागू करा, बॉम्बे गव्हर्मेंट गॅझेट लागू करा, मराठा बांधवांवर दाखल झालेले गुन्हे मागे घ्या, अशा विविध मागण्यांसाठी हे उपोषण सुरू असून, त्याच पार्श्वभूमीवर या आंदोलनाला पाठिंबा म्हणून एकापाठोपाठ राज्यातील जिल्हे समर्थनार्थ बंद पाळले जात आहेत. उपोषणा दरम्यान मनोज जरांगे पाटील यांची तब्येत खालावली असून जालन्यातील शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय पथक त्यांच्या सेवेसाठी घटनास्थळी दाखल आहे. त्यानुसार, मनोज जरांगे यांचा बीपी व शुगर कमी झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. मराठा आरक्षण मिळण्यासाठी आत्तापर्यंत अनेक वेळेस मनोज जरांगे पाटील यांनी उपाषणं केली असल्यामुळे त्यांची प्रकृती आता साथ देत नाही व दिवसेंदिवस त्यांची प्रकृती अतिशय गंभीर होत चालीली आहे. अक्षरशः त्यांची अशी अवस्था पाहून प्रत्येकाच्या डोळयात आश्रू अनावर होत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. एवढी बिकट अवसथा मनोज जरांगे पाटील यांची झालेली आहे. शिवाय त्यांना खाली बसलं तर उठताही येत नाही आणि उठून उभ राहिलं तर खाली बसताही येत नाही अशी अत्यंत गंभीर अवस्था त्यांची झाली असल्यामुळे ड. शंकर चव्हाण यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून सरकारला इशारा दिला आहे की, मराठा आरक्षणाबाबत तात्काळ निर्णय घेऊन मनोज जरांगे पाटील यांच्या सर्व मागण्या तात्काळ मंजूर करा व त्यांच्या तब्येतीबाबत ताबडतोब दखल घेऊन उपोषण सोडवण्यासाठी संपूर्ण शासकीय यंत्रणा हालवा, अन्यथा मनोज जरांगे पाटील यांच्या केसालाही धक्का लागला तर याद राखा, मराठे पेटून उठले तर तुमच्या शंभर पिढ्या राजकारणात नसतील असा इशारा ड. शंकर चव्हाण यांनी सोशल मिडीयाच्या माध्यमातून सरकारला दिला आहे.

# पंचायत समिती हिंगणघाटची नविन इमारतीचे भूमिपूजन संपन्न

**हिंगणघाट । प्रतिनिधी -** पंचायत समिती हिंगणघाटच्या नवं निर्मित होणाऱ्या इमारतीचे भूमिपूजन माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण -: आमदार समीर कुणावार यांचे प्रतिपादन आज हिंगणघाट येथे पंचायत समितीच्या आवारामध्ये पंचायत समिती हिंगणघाट प्रशासकीय इमारतीचे बांधकाम १४ कोटी ९९ लक्ष रूपयांचे भूमिपूजन आमदार समीर कुणावार यांच्या हस्ते रहमान मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा व सुरेश वाघमारे माजी खासदार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला भूमिपूजनाच्या कार्यक्रमावेळी सर्व मान्यवर सरपंच, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य यांना पुजेचा मान देण्यात आला अविस्मरणीय क्षणांचे मानकरी होण्याचा मान मिळाल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले तसेच हिंगणघाट तालुक्यातील सर्व मान्यवर सरपंच, उपसरपंच यांचा सत्कार आमदार कुणावार यांच्या हस्ते पार पडला याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना आमदार कुणावार यांनी माझ्या दहा वर्षातील कारकिर्दीतील आज दिवस माझ्यासाठी अत्यंत बहुमोलाचां असून अविस्मरणीय आहे पंचायत समिती हिंगणघाटला नवीन प्रशासकीय इमारत शासनाकडून मंजूर करून घेण्याचा माझा सातत्याने प्रयत्न होता अखेर त्या प्रयत्नांना यश येत मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री व्दय, ग्राम विकास मंत्री आणि राज्य शासनाचे यावेळी त्यांनी आभार मानले आणि संबंधित अभियंता



आणि कंत्राटदार यांना तातडीने काम सुरू करण्याचा सुचना देत उत्तम दर्जाचे काम करण्याचे निर्देश दिलेत. याप्रसंगी रहमान साहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वर्धा, सुरेश वाघमारे माजी खासदार, गंगाधरराव कोल्हे माजी सभापती पंचायत समिती हिंगणघाट, शारदा आंबटकर, माजी सभापती पंचायत समिती हिंगणघाट, प्रफुल्ल बाडे माजी उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती हिंगणघाट, आकाश पोहाणे, डॉ पर्बत, अंजने गट विकास अधिकारी पंचायत समिती हिंगणघाट, खैरे उपविभागीय अभियंता लघू पाटबंधारे विभाग, घनश्याम येरलेकर, ज्योत्स्ना सरोदे माजी जिल्हा परिषद सदस्य, वैशाली पुरके, वंदना मडावी, लता घवघवे, इंदिरा उरकुडकर, सुनंदा सांयकर, बेहेकर सहाय्यक गटविकास अधिकारी हिंगणघाट, गुडंतवार कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग वर्धा, अमोल चिरुटकर, सचिन सावरकर, नितीन सुकळकर आदी मान्यवर उपस्थित होते

# जालना जिल्ह्यात यलो अलर्ट; सोसाट्याचा वारा, पावसाची शक्यता

## दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दिनांक २३ ते दि. २६ सप्टेंबर २०२४ रोजी यलो अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. तसेच दिनांक २३ ते २६ सप्टेंबर २०२४ रोजी यलो अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. दिनांक २३ ते दि. २६ सप्टेंबर २०२४ रोजी यलो अलर्ट जारी केला आहे. तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे, दिनांक २३ ते २६ सप्टेंबर २०२४ रोजी तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह, सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे. दिनांक २३ ते २६ सप्टेंबर २०२४ रोजी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवली आहे.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्हयातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहु नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे. मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/ दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे. वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा. अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतक-यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी. जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे. सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी. आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण) शशिकांत हदगल यांनी केले आहे.

# सुरेश पोटे यांची अध्यक्ष पदी बिनविरोध निवड

**मुंबई -** महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघ, फेस्कॉम मुंबई प्रादेशिक विभागाची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष शरद डिचोलकर यांच्या अध्यक्षतेखाली नेहरू नगर ज्येष्ठ नागरिक मंडळ कुर्ला येथे संपन्न झाली. सभेची सुरवात श्री. साने गुरुजी यांच्या खरा तो एकची धर्म या कवितेने करण्यात आली. मागील सभेचे इतिवृत्त वाचन सचिव श्री सुरेश पोटे यांनी केले. ज्ञात-अज्ञात दिवंगतांना श्रद्धांजली, वार्षिक जमा-खर्च मंजुरी, लेखा परीक्षकांची नेमणूक करणे इत्यादी कामकाज झाले. सदर सभेत, निवडणूक अधिकारी अनंत भाटे व यशवंत देशपांडे यांनी अलिकडे पार पडलेल्या निवडणुकीचा निकाल जाहीर केला. निवडणूक बिनविरोध झाली

त्यानुसार फेस्कॉम मुंबई प्रादेशिक विभागाची २०२४ ते २०२७ पर्यंतची नवीन कार्यकारिणी अधिकृतपणे जाहीर करण्यात आली ती खाली नमूद केल्याप्रमाणे आहे. अध्यक्ष सुरेश पोटे, उपाध्यक्ष डॉ रेखा भातखंडे, सचिव मुकुंद फडतरे, सह सचिव राजन फणसीकर, कोषाध्यक्ष सुधीर सावंत, कार्यकारणी सदस्य म्हणून प्राचार्य लता पोवार, बबन पाटणकर, बळवंत पाटील व सुरेश सरनोबत यांची निवड झाली.

त्याचप्रमाणे, सर्वसाधारण सभेत संपर्क सचिव दिलीप गाडेकर, संघटक सचिव स्वाती फडके, सांस्कृतिक अध्यक्ष म्हणून प्रतीभा सराफ, निमंत्रित सदस्य उज्वल पाठरे, दिलीप धारकर, विनय पाटील व संजय साने यांची निवड करण्यात आली. सल्लागार पदी विजय औंधे यांची निवड एकमताने करण्यात आली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकार-यांनी आपला अल्पपरिचय करून दिला. या सभेस पदसिद्ध अध्यक्ष श्री विजय औंधे व व श्री शरद डिचोलकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. नूतन कार्यकारिणी सदस्यांना अध्यक्ष शरद डिचोलकर यांच्याहस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.



सुरेश पोटे यांनी सर्वांचे आभार मानताना आपण सर्वांनी एकत्र व एक विचाराने काम करावे असे आवाहन केले. राष्ट्रगीत गायनानंतर अल्पोपहार करून अत्यंत खेळी मेळीच्या वातावरणात सभा समाप्त झाली.

# परतुर राजस्थानी विप्र समाजाच्या अध्यक्षपदी मुन्ना चितोडा



**परतूर । प्रतिनिधी -** येथील राजस्थानी विप्र ब्राह्मण समाजाची रविवार दिनांक २२ सप्टेंबर रोजी स्थानिक गायत्री देवी मंदिर येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत समाजाचे जेष्ठ मंडळी विजय सारस्वत सर, सुरेश भाऊ जोशी, पप्पू सेठ दायमा यांच्या मार्गदर्शनाखाली सन् २०२४ २०२५ या वर्षाकरिता समाजाच्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

यात अध्यक्षपदी श्याम सुंदर उर्फ मुन्नाभाई चितोडा, उपाध्यक्षपदी नटवरलाल खंडेलवाल, सचिवपदी अश्विन कुमार दायमा, कोषाध्यक्षपदी श्यामशेठ ओझा, सहसचिवपदी संतोष व्यास, तर संघटक पदी शिवकुमार जोशी व गणेश शर्मा यांची निवड करण्यात आली.

या बैठकीत देवी श्री गायत्री मंदिर येथे नवरात्र महोत्सवात देवीची स्थापना करण्यात येणार असून, नवरात्र दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे, नवरात्र महोत्सव समितीचे केदार खंडेलवाल व लखन जोशी यांनी सांगितले बैठकीच्या स्थळी नवनियुक्त पदाधिकारी यांचा पुष्पहार व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी विप्र समाजाचे सर्व बांधव उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी पांचाळ यांना प्रतिष्ठित 'गोल्डन स्कॉच' पुरस्कार

## जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी स्वीकारला पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्याने रेशीम अंडीपुज निर्मितीपासून ते रेशीम धागा निर्मितीपर्यंतच्या सर्व प्रक्रिया उपलब्ध करुन देण्यासाठी 'मलबेरी सिल्क सॉईल टू फॅब्रिक प्रोसेस अंडर वन रुफ' हा प्रकल्प उत्कृष्टपणे राबविल्याबद्दल स्कॉच या नामंकित संस्थेचा 'स्कॉच २०२४ राष्ट्रीय पुरस्कार' जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना प्रदान करण्यात आला.



स्कॉच या संस्थेकडून विविध क्षेत्रातील अतुलनीय कामगिरीकरीता दरवर्षी हा पुरस्कार देण्यात येतो. जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात रेशीम प्रक्रिया उद्योगासाठी विविध सकारात्मक पाऊले उचलण्यात आल्याने रेशीम प्रक्रिया उद्योगाला चालना देण्यासाठी जिल्हा प्रशासनाला यश आले. याच कामाची दखल घेत स्कॉच संस्थेच्यावतीने श्री. पांचाळ यांची या पुरस्कारासाठी निवड केली.

स्कॉच संस्थेच्यावतीने नवी दिल्ली येथे शनिवार, २१ सप्टेंबर रोजी आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात रेशीम विकास अधिकारी श्री. मोहिते यांनी जिल्हाधिकारी श्री. पांचाळ यांच्यावतीने हा पुरस्कार स्विकारला होता. आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात रेशीम उपसंचालक डॉ. महेंन्द्र ढवळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांना हा पुरस्कार सुपूर्द करण्यात आला.

यावेळी डॉ. पांचाळ म्हणाले की, जालना जिल्ह्यात हा रेशीम प्रकल्प यशस्वी करण्याकरीता रेशीम अधिकारी अजय मोहिते, तहसिलदार विक्रांत मुंढे, अंबडचे तत्कालीन तहसिलदार चंद्रकांत शेळके, घनसावंगी तहसिलदार श्रीमती योगिता खटावकर यांचे सहकार्य लाभले. या प्रकल्पाच्या माध्यमातून भविष्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना समृध्दी प्राप्त होऊन रोजगार निर्मितीत नक्कीच वाढ होईल.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपविभागीय अधिकारी श्रीमंत हारकर, दिपक पाटील, डॉ. दयानंद जगताप, पद्ममाकर गायकवाड यांच्यासह सर्व तहसिलदार, नायब तहसिलदार विविध विभागातील अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

रेशीम कोष बाजार पेठ तसेच महिको यांच्यामार्फत रेशीम अंडीपुज निर्मिती केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या बीजकोषाला १ लाख १३ हजार रुपये प्रती क्विटंल दर बीज कोष निर्मिती करणाऱ्या शेतकऱ्यांना मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दूप्पटीने वाढले आहे. तसेच रेशीम धागा निर्मितीपर्यंतच्या सर्व प्रक्रिया उपलब्ध असणारा जालना हा महाराष्ट्रातील एकमेव जिल्हा ठरला आहे.

जालन्याच्या रेशीम कोष बाजारपेठेत राज्यातील सर्व जिल्ह्यांतुन शेतकरी रेशीम कोष विक्री करण्याकरीता येतात. त्यामुळे या संधीचा फायदा घेऊन जालना जिल्ह्यातील जास्तीत-जास्त शेतकऱ्यांनी तुती लागवड करून रेशीम उद्योगाकडे वळत आहे.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.